॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२२ ( ) राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांकरीता प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास प्रशिक्षण शिबिर दि. २३ ते २७ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित होत असल्याने यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या तीन पुरुष व तीन महिला स्वयंसेवक व एक कार्यक्रम अधिकारी (पुरुष) असे आठ व्यक्तींचा संघ यात सहभागी झाला असून संघ अमरावतीकडे रवाना झाला आहे.

सदर शिबिरात महाराष्ट्रातील सर्व कृषी, अकृषी/तंत्र/आरोग्य विद्यापीठे यांचे संघ सहभागी होत आहे.कबचौ उमविच्या संघात अविनाश सुधार भारुडे (ए.आर.बी.गरुड कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदूर्णी) , रोहित सरग, (क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर), दिनेश वळवी (कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धडगाव), आम्रपाली सावळे (ॲड.एस.ए.बाहेती कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव), रमका पावरा (श्रीमती एच.आर.पटेल महिला महाविद्यालय, शिरपूर), कविता वसावे (एस.जे.एस कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर) तर संघ व्यवस्थापक म्हणून डॉ.सचिन नांद्रे (उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल) यांचा सहभाग आहे. सहभागी झालेल्या या रासेयोच्या स्वयंसेवकांनी विविध शिबिरात राष्ट्रीय व राज्य पातळीवर उल्लेखनिय कामगिरी केली आहे. त्यांची संघात निवड झाल्याबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, व्य.प.सदस्य दिलीप पाटील, रासेयोचे संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील व प्रभारी वित्त व लेखाअधिकारी एस.आर.गोहिल यांनी व संबंधित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी अभिनंदन कले असून संघास प्रेरणा शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी